# अमरावती महानगरपालिका, अमरावती
# दिनांक ०३.११.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

## (प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक ४० :-** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, अधिसुचना दिनांक ०९ मे २०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) अन्वये जाहिरात परवाना फी चे दर निश्चित करण्यास मान्यता प्रदान करणे बाबत.

**ठराव क्रमांक ४० :-** महाराष्ट्र शासन नगरविकास विभागामार्फत, दिनांक ०९ ते २०२२ रोजी जाहिरात बाबत अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याची कलमे २४४ व २४५ आणि कलम ४५६ अ चे पोटकलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, उक्त कलम ४५६ अ च्या पोट कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, पूर्वप्रसिध्दी नंतर आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने आणि महानगरपालिकांनी प्रसिध्द केलेले मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ आणि इतर सर्व नियम, आदेश, संलेख यांचे अधिक्रमण करुन, महानगरपालिका क्षेत्रातील आकाशचिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण करणारे नियम करण्यात आलेले आहेत.

उक्त नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्कायसाईन)व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम २०२२ असे म्हणावे, सदर नियमातील २० क अन्वये परवाना शुल्क निश्चित करण्याचे संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८६ (२) अंतर्गत खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप (चौरस फुट) | | परवाना फी (प्रति चौरस फुट प्रति माह करीता ) |
|---|---|---|---|---|
| १ | फुग्यावरील जाहिरात | प्रति दिवस प्रति बलुन प्रमाणे | | रु. ४००/- |
| २ | अ)फिरत्या वाहनावरील जाहिरात<br>ब) स्थिर वाहनावरील जाहिरात | प्रति दिवस प्रति वाहन प्रमाणे | सायकल रिक्षा | रु. ५०/- |
| | | | तिनचाकी वाहन | रु. १००/- |
| | | | चार चाकी वाहन | रु. २००/- |
| ३ | तात्पुरते जाहिरात फलक (कालावधी जास्तीत जास्त ३ दिवसां करीता) | नियमात नमुद साईज | १)६ फुट X ३ फुट<br>२)८ फुट X ३फुट<br>३)८ फुट X ६फुट | रु. ५०/- प्रति दिन रु. ७५/- प्रति दिन रु. १००/- प्रति दिन |
| ४ | वाहतुक थांब्यावरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ४/- |
| ५ | युनीपोल वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. १०/- |
| ६ | एलईडी/एलसीडी/न्युऑन साईन जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. २०/- |
| ७ | गॅन्ट्री वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. १०/- |
| ८ | काचेच्या दर्शनी भागावरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ३/- |
| ९ | ग्लोसाईन वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ५/- |
| १० | ग्राफिटी (भिंतीवरील रंगचित्रे) जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | | रु. ७/- |
| ११ | किऑस्क वरील जाहिरात (विद्युत स्तंभ) (जमिनीपासून १४ फुट उंच) | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे रुंदी ३ फुट X लांबी ४ फुट | | रु. ३०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | लेझरद्वारे केलेली जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | रु. २५/- |
| १३ | लॉलीपॉप वरील जाहिरात | प्रति चौरस फुट प्रति माह प्रमाणे | रु. ५/- |
| १४ | अ) आकाशचिन्ह जमिनीवरील<br>ब) आकाशचिन्ह इमारतीवरील | १० फुट X २० फुट<br>२० फुट X १० फुट<br>२० फुट X २० फुट<br>२० फुट X ३० फुट<br>२५ फुट X २५ फुट<br>३० फुट X २० फुट<br>३० फुट X ३० फुट<br>४० फुट X १० फुट<br>४० फुट X २० फुट<br>४० फुट X ३० फुट<br>३० फुट X १५ फुट | अ) रु.३/- (कमर्शियल (मुख्य) परिसर सर्व साईज करीता)<br><br>अ) रु.२/- (रेसिंडेंशियल (आतील) सर्व साईज करीता) |

**टीप:-** १) नियत साईज पेक्षा जास्त वाढ केल्याचे आढळुन आल्यास संबधीत जाहिराती वर मुळ शुल्काचा १०% प्रतिमाह प्रमाणे वाढ करण्यात येईल व विहित मुदतीत दंड न भरल्यास परवाना रद्द करण्यात येईल

२) सदर नियमातील २० (क) अन्वये सदर परवाना शुल्क आकारणी वरील वाढ दर तिन वर्षानंतर १०% असेल

३) सदर नियमातील २० (ख) अन्वये जर शुल्क विहित कालावधीत प्रदान करण्यात आले नाही तर एक ते तीन महिन्याच्या विलंबा करीता परवाना शुल्काच्या १०% रकमेइतकी आणि तीन ते सहा महिन्याच्या विलंबा करीता २५% रकमेइतकी आपसमेळाची रक्कम देय असेल व सहा महिन्याच्या पुढे होणाऱ्या विलंबा करीता परवाना रद्द करण्यात येईल.

४) सदर नियमातील ३ (७) अन्वये कोणताही जाहिरात फलक परवानगी न घेता बसविण्यात आला असेल असा कोणताही जाहिरात फलक आकारणीयोग्य फी च्या पाच पट इतकी प्रशमन फी आकारुन नियमीत करता येईल मात्र असा जाहिरात फलक किंवा जाहिरात ही या नियमाच्या तरतुदीनुसार असावी.

उक्त दरांस मा. आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांनी दिनांक १८.१०.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून त्या अनुषंगाने व मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. १५५/२०११ अंतर्गत निर्गमित आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व ५ झोन निहाय लावण्यात येणारे जाहिराती बाबत पुढील अनुषंगीक कार्यवाहीस्तव सदर प्रशासकीय विषयास मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान करणे करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.